| | | | |
|---|---|---|---|
| **PUBLICATION** | Mumbai Choufer | **DATE** | 16th July 2019 |
| **EDITION** | Mumbai | **PAGE NO.** | 11 |

मुंबई चौफेर




म्हणजे गुरुपौर्णिमेची अनोखी पर्वणी म्हणायला हवं. त्यासाठी 'श्री गुरुदेव दत्त' मालिकेचा गुरुपौर्णिमा विशेष भाग आज गुरुपौर्णिमेला सायंकाळी ७.३० वाजता पाहायला विसरू नका.

करण्याच्या तयारात असता. मुरारी व करुणा ईलायचीचे कपाट रिकामे करत साफसफाई सुरू

यशस्वी होतील का? आगामी एपिसोड्स आमच्या प्रेक्षकांसाठी रोमांचक क्षण घेऊन येणार आहेत.

# घर फक्त तिचं, तिच्यासाठी हर हायनेस्ट!

महिला सक्षमीकरणाच्या दिशेने केवळ विचार न मांडता त्याला आपल्या अनुभवाच्या आधारे 'हर हायनेस्ट' या फक्त स्त्रियांसाठी असलेल्या गृहप्रकल्पाला मूर्त रूप देणाऱ्या त्रिमित रचनाने या प्रकल्पाच्या माध्यमातून स्त्रीचे भावविश्व आणखीन खंबीर करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे.

कर्तृत्त्वाची मोठी भरारी घेणारी, निर्णयक्षम असलेली आजच्या काळातली स्त्री अजूनही घराच्या निर्णयाच्या बाबतीत समाजाच्या सर्व स्तरांत थोडीशी मागे दिसते. उच्चवर्ग, मध्यमवर्गातही हे प्रमाण खूप कमी आहे. इच्छा असूनही घराची कागदपत्रे, सर्व सोपस्कार आपल्याला जमतील का? अशी थोडीशी साशंकता तिच्या मनात असते. या प्रकल्पाच्या निमित्ताने त्रिमित रचना यांनी दर्जेदार, सुरक्षित आणि परवडणारी घरे उपलब्ध करून देऊन स्त्रियांना निःशंकपणे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी दिली आहे.

या प्रकल्पाचे नेमके स्वरूप स्पष्ट करताना त्रिमित रचनाच्या सर्वेसर्वा प्रज्ञा पोंक्षे म्हणाल्या, 'हर हायनेस्ट हे आजच्या काळातल्या प्रत्येक स्त्रीसाठीचा नवा विचार आहे, जो आता साकार होणार आहे. पुरेसा पैसा, निर्णयक्षमता असूनही आपल्या स्वप्नपूर्तीच्या बाबतीत मागे राहणाऱ्या स्त्रीला नवे पाऊल या दिशेने उचलता यावे यासाठीची ही संधी आहे, जी आम्ही उपलब्ध करून देत आहोत. स्वतःच्या नावाचे घर ही एक सर्वात मोठी ओळख आहे आणि ती आजच्या प्रत्येक स्त्रीला मिळावी यासाठीची हर हायनेस्ट ही आम्ही केलेली नव्या विचाराची प्रत्यक्ष सुरुवात आहे.'

१९ जुलै २०१९ रोजी शिवाजी पार्क येथील सावरकर स्मारक येथे सुप्रसिध्द चित्रपट दिग्दर्शिका, निर्मात्या सुमित्रा भावे व सुनील सुकथनकर, तसेच विविध क्षेत्रांतल्या अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत ''हर हायनेस्ट''चा शुभारंभ सोहळा होणार आहे. महिला सशक्तीकरण, स्वातंत्र्य आणि स्वतःची ओळख या विषयावर चर्चासत्र, स्त्रिचं खरं घर यावरचा 'वेलकम होम' या मराठी सिनेमाचं विशेष स्क्रीनिंग असं कार्यक्रमाचं अतिशय विषय सुसंगत स्वरूप आहे. तरी महिलांनी नावनोंदणीसह कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.